FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0167731

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. ४, वर्ष Year २०२०, दिनांक Date २१/९/२०२०

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections ०७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........, तारीख पासून ०८/०९/२०२० वेळ ........, तारीख पर्यंत २०/९/२०२० वेळ १४.१०
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १८/०९/२०२०, वेळ Time १०:३०
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०२/२०२०, तारीख Date २१/०९/२०२० वेळ Time ०२.१५

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ Chouki / Beat / O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road: भुमी मार्ट, शक्ती एन्क्लेव्ह्ज बिल्डींग, शॉप न- ८ ते १५, जनकल्याण नगर, बिला बॉग हायस्कूलच्या समोर, मालाड (प), मुंबई-९५
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   Nearest identifiable place, Village, Post, Taluka, Dist., State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   In case, outside the limit of this Police Station, Taluka, Dist., State

6. तक्रारदार / खबर देणाऱ्याचे, नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name अरविंदसिंह नटुभा जाडेजा (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name नटुभा जाडेजा
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८६९७४४६६६
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. -, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : ........, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.: रुम न-१२, प्लॉट नं-१८८, आशिष सहकारी गृहनिर्माण संस्था. मर्या., मंगलमुर्ती जवळ, चारकोप सेक्टर न-१, कांदिवली (प), मुं- ४०००६७
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   लोकसेवक परेश चंद्रकांत कोरगांवकर, सॅनिटरी इन्स्पेक्टर, पी/नॉर्थ वॉर्ड
   मुंबई महानगरपालिका

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी श्री. अरविंदसिंह नट्टुभा जाडेजा, वय ५८ वर्षे
रा. ठि. रुम नं-१२, प्लॉट नं-१८९, आशिष सहकारी गृहनिर्माण
संस्था मर्यादित, मंगलमुर्ती जवळ, चारकोप सेक्टर नं-१,
कांदिवली (प), मुंबई-६७ यांच्या स्वतंत्र कागदावर सविस्तर जबाब
नोंद करण्यात आला असून तिच गुन्ह्याची प्रथम खबर
म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष,

(गणेश कानडे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि., मुंबई विभाग
मुंबई.

Scanned with CamScanner

फिर्याद

दिनांक – २०/०१/२०२०

श्री. अरविंदसिंह नट्टभा जाडेजा, वय ५८ वर्षे, व्यवसाय:– धंदा, रा.ठि.– रूम.नं. १२, प्लॉट नं.१८९, आषिश सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, मंगलमृती जवळ, चारकोप सेक्टर नं.१, कांदिवली (प), मुंबई, मो. न. ९८६९७४४६६६

---

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर गेल्या २५ वर्षापासुन रहावयास आहे. माझे कुटूंबात माझी पत्नी व माझी दोन मुले रहावयास आहेत. मी ''भूमी मार्ट'', दुकान क्र. ०८ ते दुकान क्र. १५, शक्ती इनक्लेव्ह, शक्ती कॉम्पलेक्स, मालाड पश्चिम मुंबई हे भाडेतत्वावर चालवत आहे.

मी दिनांक ०३/०१/२०२० रोजी पी नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड, मुंबई या कार्यालयात हेल्थ विभागाचे नविन लायसन्स मिळण्याकरीता अर्ज केला आहे, व त्याकरीता लागणारे शासकीय शुल्क सुध्दा मी भरलेले आहे. अर्ज केल्यानंतर साधारण आठवडयांनतर मला बी.एम.सी कार्यालयातून मोबाईल क्र. ९८९२१४८८४५ वरून माझे उपरोक्त नमुद मोबाईल क्रमांकावर फोन आला. फोन करणाऱ्या इसमाने ते हेल्थ इन्स्पेक्टर परेश कोरगावकर बोलत असुन माझा अर्ज कारवाईकरीता त्यांच्याकडे आला असल्याचे त्यांनी सांगितले व मला कागदपत्रांसह त्यांच्या कार्यालयात येण्यास सांगितले.

दिनांक ०४/०१/२०२० रोजी मी व माझा मित्र श्री. खोडीलाल हरजी पटेल, रा.ठि.– ए/१०२, ॲरिस लियो सगिततारीयस को.ऑ.हौ.सोसा. लि. जनकल्याण नगर, मार्वे रोड, मालाड (प), मुंबई असे बी.एम.सी कार्यालयातील हेल्थ इन्स्पेक्टर परेश कोरगावकर यांना भेटलो असता त्यांनी हेल्थ विभागाचे लायसन्स मिळण्याकरीता हेल्थ अधिकारी व वॉर्ड अधिकारी तसेच त्यांना स्वत:ला असे मिळून दोन लाख रूपये दयावे लागतील असे सांगितले व तडजोडीअंती माझेकडे दिड लाख रूपयांची मागणी केली.

मला पी नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड, मुंबई येथील हेल्थ इन्स्पेक्टर परेश कोरगावकर यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी व माझा मित्र श्री. खोडीलाल पटेल असे दोघे मिळुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक १७/०१/२०२० रोजी समक्ष हजर राहून पो.नि. कानडे यांना भेटलो असता त्यांनी मला त्यांच्या वरिष्ठांकडे उभे केले. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. कानडे यांनी परेश कोरगावकर हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले. मला मराठी व हिंदी लिहीता येत नसल्याने पो.नि. कानडे यंनी स्वत: हिंदी भाषेमध्यें माझे सांगण्याप्रमाणे अर्ज कॉम्प्युटरवर टंकलिखित करून मला हिंदीतून वाचून दाखविला व त्यावर माझी सही घेतली. त्यानंतर दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी ओळख करून दिली. पोनि. कानडे यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. कानडे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि कानडे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

पोनि कानडे यांनी दिनांक १८/०१/२०२० रोजी पंचांसमक्ष मी चालवित असलेल्या भूमी मार्ट, दुकान क्र. ०८ ते दुकान क्र. १५, शक्ती इनक्लेव्ह, शक्ती कॉम्पलेक्स, मालाड पश्चिम मुंबई या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले.

दिनांक १८/०१/२०२० रोजी पो.नि. कानडे, सपोआ मुगुटराव, दोन पंच व पोलीस पथक हे ला.प्र.वि कार्यालयातून निघून माझे मित्र श्री. खोडीलाल पटेल हे राहत असलेल्या ए/१०२, ॲरिस लियो सगितारीयस को.ऑ.हौ.सो.लि., जनकल्याण नगर, मार्वे रोड, मालाड पश्चिम, मुंबई या ठिकाणी आल्यानंतर पो.नि. कानडे यांनी माझी व माझा मित्र पटेल यांच्याबरोबर पडताळणी पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर मला व माझे

Scanned with CamScanner

मित्र पटेल असे आम्हाला लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता भूमी मार्ट, दुकान क्र. ०८ ते दुकान क्र. १५, शक्ती इनक्लेव्ह, शक्ती कॉम्पलेक्स, मालाड पश्चिम मुंबई येथे पाठविले. व लोकसेवक हा भुमी मार्ट जवळ आला असता पोनि कानडे लगेचच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर हा तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बनियानला लावतील. सदर मार्टमध्ये मी, पंच व पोलीसांसह लोकसेवक येण्याची वाट पाहत होतो. तेव्हा मला लोकसेवक परेश कोरगावकर यांचा माझे मोबाईलवर फोन आला व त्यांनी मला महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील त्यांच्या कार्यालयात बोलाविले. मी पो.नि कानडे यांना सदरची माहिती सांगितली असता त्यांनी मला पुन्हा माझा मित्र पटेल यांच्या घरी जावुन पुढील रूपरेषा ठरविण्यात येईल असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. कानडे यांनी मला पुन्हा पडताळणीच्या वेळी घ्यावयाच्या खबरदारीबाबत सुचना दिल्या व पंच महेर यांच्यासोबत जावून लोकसेवक यांची महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग, मालाड, मुंबई येथे भेट घेण्यास सांगितले. पो.नि. कानडे यांनी मला जर लोकसेवकाने पैशाबाबत विचारणा केली, तर माझा मित्र श्री. पटेल यांच्या मोबाईलवर स्पिकर चालु करून फोन करण्यास सांगितले व पैशाबाबत विचारणा करण्यास सांगितले व पैशाबाबत लोकसेवकाबरोबर संभाषण झालेनंतर पडताळणीकरीता वापरण्यात आलेला डिजिटल व्हाईस रेकॉर्डर हा लोकसेवकाच्या कार्यालयातून बाहेर आल्यानंतर कोणासही समजणार नाही अशा पध्दतीने पंच महेर यांच्या हातात देण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि. कानडे यांनी पंच श्री. महेर यांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर घेऊन लिबर्टी गार्डनमागे, श्रीमती बाफना वाणिज्य कला महाविद्यालयाच्या बाजूला, त्रिमुर्ती अपार्टमेंटच्या समोर उभ्या असलेल्या माझे मित्र श्री. पटेल यांचे वाहन क्र. एम.एच.४७ एएन २२७७ येथे घेऊन येण्याबाबत सुचना दिल्या.

पोनि कानडे यांनी लोकसेवक परेश कोरगावरकर यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. महेर यांचे सह ऑटोरिक्षाने पाठविले. माझी व लोकसेवक परेश कोरगावरकर यांची भेट झाली व आमच्या दोघांमध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर मी कार्यालयाच्या बाहेर आलो व पो.नि कानडे यांनी सांगितल्याप्रमाणे माझे हातामधील कागदपत्रांची फाईल व व्हाईस रेकॉर्डर पंच श्री. महेर यांच्या ताब्यात दिला व पंचाला जाण्यास सांगितले.

त्यानंतर मी माझा मित्र श्री. पटेल यांना फोन केला असता ते लोकसेवकाच्या कार्यालयात आले तेथे आल्यानंतर मी, माझा मित्र पटेल व लोकसेवक यांच्यामध्ये कामासंदर्भात व पैशाबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी, माझे मित्र पटेल व पंच देवकुळे असे लिबर्टी गार्डनमागे, श्रीमती बाफना वाणिज्य कला महाविदयालयाच्या बाजूला, त्रिमुर्ती अपार्टमेंटच्या समोर उभ्या असलेल्या माझे मित्र श्री. पटेल यांचे वाहन क्र. एम.एच.४७ एएन २२७७ येथे आलो असता पो.नि. कानडे यांनी डिजीटल रेकॉर्डर बंद केला.

त्यावेळी मला समजले की, पो.नि. कानडे यांनी यापुर्वी मला लावून पाठविलेला व्हाईस रेकॉर्डर पंच श्री महेर यांनी, माझे मित्र श्री. पटेल यांचे वाहन क्र. एम.एच.४७ एएन २२७७ मध्ये बसलेल्या पोनि कानडे यांचे ताब्यात दिला होता. त्यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकून लोकसेवक यांची पडताळणी दरम्यान स्पष्ट लाचेची मागणी न झाल्याने माझा मित्र श्री. पटेल यांच्या खिशात पुन्हा नमुद डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ठेवुन लोकसेवक यांच्या कार्यालयात पंच श्री. देवकुळे यांच्यासह पाठविले होते.

त्यांचे मित्र श्री. पटेल हे लोकसेवकाला भेटून परत आल्या नंतर पो.नि. कानडे यांनी श्री पटेल यांच्या खिशात ठेवलेल्या डिजीटल रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता पडताळणी दरम्यान लाचेची स्पष्ट मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लोकसेवक यांना लाच रक्कम दि. २०/०१/२०२० रोजी दयावयाची असल्याने पो.नि. कानडे यांनी पुढील कारवाई तात्पुरती स्थगित केल्याचे सांगितले.

दिनांक २०/०१/२०२० रोजी पोनि कानडे, सपोआ मुगुटराव, दोन पंच व पोलीस पथक हे ला.प्र.वि कार्यालयातून निघून माझे मित्र श्री. खोडीलाल पटेल हे राहत असलेल्या ए/१०२, ऑरिस लियो सगितारीयस को.ऑ.हौ.सो.लि., जनकल्याण नगर, मार्वे रोड, मालाड पश्चिम, मुंबई या ठिकाणी आले. त्यानंतर पोनि कानडे

Scanned with CamScanner

यांनी मला लोकसेवक यांनी लाचेच्या रकमेची मागणी केली असुन आज रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १,५०,०००/– (रू. २,०००/– दराच्या ७५ भारतीय चलनी नोटा) स्वत:चे ताब्यात घेतली. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच पोनि कानडे यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला व माझा मित्र पटेल यांना डावा हात डोक्यावरून फिरवून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर माझे मित्र पटेल याचे उपरोक्त नमुद राहते घरी पंचासमक्ष लाचेच्या रकमेस अँथ्रासीन पावडर लावली व पोलीस पथक व पंचांसह सापळा कारवाईकरीता माझे भूमी मार्ट, दुकान क्र. ०८ ते दुकान क्र. १५, शक्ती इनक्लेव्ह, शक्ती कॉम्पलेक्स, मालाड पश्चिम, मुंबई येथे सकाळी ०८.४५ वा.च्या दरम्यान आलो. साधारण १०.४५ वाजपर्यंत लोकसेवक हा माझे कार्यालयात न आल्याने पो.नि. कानडे यांनी मला पुन्हा माझा मित्र पटेल यांच्या घरी जावुन पुढील रूपरेषा ठरविण्यात येईल असे सांगितले.

माझा मित्र श्री. पटेल यांच्या घरी गेल्यानंतर पो.नि. कानडे यांनी मला माझे मोबाईलवरून लोकसेवक यांना फोन करण्यास सांगितले. तेव्हा मी ११.५४ वाजता लोकसेवक यांच्या मोबाईल क्र. ९८९२१४८८४५ वर फोन केला व कधी येणार याबाबत विचारणा केली असता त्यांनी साधारण १४.०० वाजताच्या सुमारास भेटण्यास येतो असे सांगितले. सदर मोबाईलवरील संभाषण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे.

त्यानंतर पोनि कानडे, सपोआ मुगुटराव, दोन पंच व पोलीस पथक हे भूमी मार्ट, दुकान क्र. ०८ ते दुकान क्र. १५, शक्ती इनक्लेव्ह, शक्ती कॉम्पलेक्स, मालाड पश्चिम मुंबई या ठिकाणी १३.०० वाजताच्या सुमारास आलो. साधारण १४.१० वाजताच्या सुमारास लोकसेवक हे माझे उपरोक्त नमुद दुकानात आले त्यावेळी मी व माझे मित्र पटेल यांनी कामासंदर्भात चर्चा केली व यापुर्वी ठरलेली माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १,५०,०००/– (रू. २,०००/– दराच्या ७५ भारतीय चलनी नोटा) लोकसेवक यांच्याकडे दिली व ती त्यांना मोजून घेण्यास सांगितली असता त्यांनी ती मोजुन त्यांच्या पँटच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर माझा मित्र पटेल याने दुकानातुन बाहेर जावून पोलीस पथकास लागलीच पुर्वनियोजीत इशारा म्हणुन डोक्यावर डावा हात फिरवुन इशारा केला. त्यावेळी लागलीच पोलीसांनी दुकानात येवुन लोकसेवक परेश कोरगावरकर यांस रू.१,५०,०००/– लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले.

तरी लोकसेवक परेश कोरगावकर, हेल्थ इन्सपेक्टर, पी नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड, मुंबई यांनी माझे हेल्थ विभागाचे नविन लायसन्स मिळण्याकरीता हेल्थ अधिकारी मॅडम, वॉर्ड अधिकारी व त्यांना स्वत:ला पैसे दयावे लागतील असे सांगुन रू. १,५०,०००/– लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द तक्रार आहे. माझे लोकसेवक परेश कोरगावकर यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती मला हिंदीतून समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( गणेश कानडे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ ........
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळ व ठिकाणी आलोसे परेश कोरगांवकर यांनी फिर्यादी यांना त्यांच्या भूमी मार्ट, शक्ती एन्क्लेव्हज बिल्डींग, शॉप नं- ८ ते १५ जनकल्याण नगर, बिला बाँग हायस्कूलच्या समोर, मालाड (प), मुंबई - ९५ येथील हेल्थ विभागाचे नवीन लायसन्स देण्याकरिता रु. २,५०,००० /- इतक्या रकमेची कायदेशीर परिश्रमाशिवाय स्वत: करिता मागणी करून ती स्विकारताना, रंगेहाथ पकडले म्हणून कलम ७, भ्र. प्र. अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........
District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name गणेश मधुकर कानडे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ........
Posting
Code No. of I. O. ........

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

GOV Reg.-125×5=150 L93-142-2619-PA3-4K1-625

Scanned with CamScanner